महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २५१ वे दिनांक : ०७/०९/२०२६ वार : सोमवार

## ‘डीजे बंदीमुळे काहींना वाईट वाटत असेल तर वाटू द्या’: संजय शिरसाटांची ठाम भूमिका



**छत्रपती संभाजीनगर :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजेच्या वापरावरून राज्यात चर्चा सुरू असतानाच छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी डीजे बंदीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. “डीजे बंदी झाली पाहिजे, हेच आमचे स्पष्ट मत आहे. डीजे बंदीमुळे काही लोकांना वाईट वाटत असेल तर वाटू द्या; मात्र लोकांचा जीव महत्त्वाचा आहे की आनंद?”, असा सवाल शिरसाट यांनी केला. गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन त्यांनी गणेश मंडळांना केले.

गणेशोत्सवाच्या नियोजनाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथे समन्वय समितीची बैठक पार पडली. या बैठकीला पालकमंत्री संजय शिरसाट उपस्थित होते. यावेळी गणेशोत्सवातील मिरवणुका, ध्वनीप्रदूषण, कायदा-सुव्यवस्था आणि पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे केवळ मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांनाच नव्हे, तर रस्त्याच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागतो, असे शिरसाट यांनी सांगितले. “डीजेमुळे अनेक लहान बालके, वयोवृद्ध आणि आजारी लोकांना त्रास होतो. ज्या-ज्या ठिकाणाहून मिरवणूक जाते, त्या परिसरातील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो,” असे ते म्हणाले. मिरवणुकीतील मोठ्या आवाजामुळे लहान मुलांना उत्सवाचा आनंद घेणेही कठीण होते. त्यामुळे गणेशोत्सव साजरा करताना इतर नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा विचार करणे आवश्यक असल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सव हा उत्साहाचा आणि श्रद्धेचा सण असला तरी तो पारंपरिक पद्धतीने साजरा करता येतो. त्यासाठी पारंपरिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन शिरसाट यांनी केले. मागील वर्षीही प्रशासन आणि गणेश मंडळांकडून डीजे न वापरण्याचे आवाहन करण्यात आले होते आणि त्याला मंडळांनी प्रतिसाद दिला होता, असा दावा त्यांनी केला. “गेल्या वेळी आम्ही आवाहन केले होते. त्याची अंमलबजावणी झाली. सर्वांनी ऐकले आणि तेवढ्याच उत्साहात गणेशोत्सव साजरा झाला. त्यामुळे याही वर्षी आम्ही सर्व गणेश मंडळांना विनंती केली आहे की, पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा,” असे शिरसाट म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर हे संवेदनशील शहर असल्याचे सांगत यंदाही डीजेच्या वापराबाबत प्रशासनाची भूमिका स्पष्ट असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. “छत्रपती संभाजीनगर हे शहर संवेदनशील आहे. गेल्या वर्षीही डीजे बंदीचा निर्णय आम्ही घेतला होता. याही वर्षी सर्वांनी ठरवले आहे की, या शहरात डीजे वाजणार नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सवाच्या नावाखाली ध्वनीप्रदूषण करून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, यावर त्यांनी भर दिला. उत्सवाचा आनंद साजरा करताना इतर नागरिकांना त्याचा त्रास होणार नाही, याची काळजी घेणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

डीजेच्या मोठ्या आवाजामुळे काही नागरिकांना आरोग्यविषयक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे उत्सवाचा आनंद महत्त्वाचा असला तरी नागरिकांचे आरोग्य आणि जीव त्याहून अधिक महत्त्वाचे आहेत, अशी भूमिका शिरसाट यांनी मांडली. “लोकांचा जीव महत्त्वाचा आहे की आनंद करणं महत्त्वाचं आहे? लोकांच्या आरोग्याशी खेळून उत्सव साजरा करण्याची गरज नाही. पारंपरिक वाद्यांसहही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करता येतो,” असे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

डीजे बंदीच्या निर्णयामुळे काही जण नाराज होण्याची शक्यता आहे. मात्र, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने निर्णय घेतला असल्याने त्याबाबत मागे हटणार नसल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले. “डीजे बंदीमुळे काही लोकांना वाईट वाटत असेल तर वाटू द्या. मात्र, नागरिकांना त्रास होणार असेल तर तो थांबवला पाहिजे,” अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली.

दरम्यान, पुण्यात गणेशोत्सवात डीजे वाजवण्यावरून सध्या वाद सुरू आहे. ध्वनीप्रदूषणाला विरोध करणारे सजग नागरिक विद्यानंद बापट यांच्या भूमिकेवरूनही वाद निर्माण झाला असून त्यांना मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणेकरांनी गणेशोत्सव सांस्कृतिक आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन केले आहे. त्यानंतर आता मंत्री संजय शिरसाट यांनीही डीजे बंदीची स्पष्ट भूमिका मांडल्याने गणेशोत्सवातील ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

## आंतरवाली सराटीत ओबीसींचेही आंदोलन : आरक्षणाच्या मुद्द्यावर मंगेश ससाणे आक्रमक




**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचे केंद्र बनलेल्या आंतरवाली सराटी येथे आता ओबीसी समाजाच्या मागण्यांसाठीही आंदोलन सुरू झाले आहे. ओबीसी नेते मंगेश ससाणे यांनी रविवारी दुपारी 12 वाजता अंतरवाली सराटी येथील सोनिया नगर परिसरात लाक्षणिक उपोषणाला सुरुवात केली. ओबीसींचे हक्क आणि आरक्षणाचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे ससाणे यांनी सांगितले.

उपोषणादरम्यान माध्यमांशी बोलताना मंगेश ससाणे यांनी राज्य सरकारच्या ओबीसी आरक्षणासंदर्भातील भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. “आमच्या हक्क-अधिकारांसाठी आम्ही हे उपोषण करत आहोत. आमचा जीव गेला तरी चालेल; आता बघू सरकारला फक्त मनोज जरांगे यांचेच ऐकायचे आहे की ओबीसींचेही ऐकायचे आहे,” असे ससाणे म्हणाले.

सरकारकडून मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात विविध जीआर आणि नोंदींच्या आधारे प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, ओबीसी समाजातील भटक्या-विमुक्त आणि इतर वंचित घटकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे ससाणे यांनी म्हटले.

मंगेश ससाणे म्हणाले की, ओबीसी समाजातील भटका विमुक्त, कैकाडी, रामोशी, वडारी यांसारख्या समाजघटकांकडे आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे नसल्याचा मुद्दा ससाणे यांनी उपस्थित केला. “आमच्या भटक्या समाजातील अनेकांकडे रहिवासाचे पुरावे नाहीत. त्यांच्याकडे ओळखपत्रेही नाहीत. अशा परिस्थितीत त्यांची वंशावळ कोण जुळवणार? त्यांच्यासाठी नोडल अधिकारी का नेमला जात नाही?” असा सवाल त्यांनी केला.

सरकारने नुकतेच नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात अधिसूचना काढल्याचा उल्लेख करत ससाणे यांनी ही संपूर्ण प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा आरोप केला. ओबीसी समाजातील वंचित घटकांसाठीही अशाच प्रकारची प्रशासकीय यंत्रणा उभारण्याची मागणी त्यांनी केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरही ससाणे यांनी गंभीर आरोप केले. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका यांसह स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षित पदांवर मोठ्या प्रमाणात बोगस कुणबी प्रमाणपत्रांच्या आधारे घुसखोरी झाल्याचा दावा त्यांनी केला.

“महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षित पदांची श्वेतपत्रिका काढली, तर 80 ते 90 टक्के पदांवर बोगस कुणबी दाखले देऊन प्रस्थापित घरातील आमदार-खासदारांच्या नातेवाइकांनी घुसखोरी केल्याचे समोर येईल,” असा दावा ससाणे यांनी केला. कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणीदरम्यान काही अर्ज फेटाळले गेल्यानंतर सरकारवर दबाव आणला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. “पडताळण्या फेटाळल्या गेल्यानंतर सरकारवर दबाव आणला जात आहे. हे चालणार नाही,” असे ते म्हणाले.

मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी सरकारकडून मंत्रिमंडळ उपसमितीच्या माध्यमातून काम केले जात असल्याचा उल्लेख करत ओबीसींच्या प्रश्नांकडेही गांभीर्याने पाहण्याची मागणी ससाणे यांनी केली. “जशी मराठा मंत्रिमंडळ उपसमिती काम करते, तशी आमची ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती आहे. सरकारला आमच्या प्रश्नांशी काही देणे-घेणे आहे की नाही?” असा सवाल त्यांनी केला.

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरून ससाणे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही थेट सवाल केला. “तुम्ही फक्त एका समाजाला अशी स्पेशल ट्रीटमेंट देता का?” असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ओबीसी समाजाच्या संविधानिक हक्कांमध्ये घुसखोरी होत असल्याचा आरोप करत सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. “तुम्हाला उपोषणाचीच भाषा कळते. त्यामुळे आम्हीही आता इथे उपोषण सुरू करत आहोत. अख्खा महाराष्ट्र पाहत आहे की एका व्यक्तीच्या हट्टामुळे महाराष्ट्राला वेठीस धरले जात आहे,” अशी टीका ससाणे यांनी केली.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसोबतच आता अंतरवाली सराटीत ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठीही आंदोलन सुरू झाल्याने या आंदोलनाकडे राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सरकार या आंदोलनाची कशी दखल घेते आणि ओबीसी नेत्यांच्या मागण्यांवर काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६


## प्राचार्य डॉ. विजय भोसले यांना 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' प्रदान



**कन्नड** : ग्रामीण उच्च शिक्षणासाठी उल्लेखनीय कार्य करणारे छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कन्नडचे प्राचार्य डॉ. विजय नानासाहेब भोसले यांना महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शनिवार, दि. ५ सप्टेंबर, २०२६ रोजी पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतजी पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला असून यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप रु. २५ हजार रोख, शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र असे आहे. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय, पर्यावरणीय व सामाजिक कार्याची ही महाराष्ट्र शासनाची राज्यस्तरीय दखल मानली जात आहे. प्राचार्य डॉ. विजय नानासाहेब भोसले व श्रीमती अश्विनी विजय भोसले यांनी हा सन्मान - पुरस्कार स्वीकारला. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी १९९४ मध्ये रसायनशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कारकिर्द सुरू केली. २००५ पासून ते महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली ई-लर्निंग, डिजिटल क्लासरूम, संगणक प्रयोगशाळा आणि करिअर मार्गदर्शन केंद्र उभारण्यात आले. कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि विद्यार्थी विकासालाही त्यांनी चालना दिली.

प्राचार्य डॉ. विजय भोसले सरांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाचा 'जागर जाणीवांचा' महिला सबलीकरण पुरस्कार (२०१४-१५), 'श्री छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार (२०१७-१८)', उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार (२०२४) आणि विद्यापीठाचा 'आदर्श परीक्षा केंद्र पुरस्कार (२०१४)', 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार-२०२६' प्राप्त झाले आहेत. विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात महाविद्यालयाने सात वेळा 'उत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय' हा बहुमान मिळवला. महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांना 'श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' मिळाले आहेत.

गेल्या २५ वर्षांपासून वृक्षलागवड करून महाविद्यालय परिसराचा 'ऑक्सिजन पार्क' म्हणून विकास करण्यात आला असून, शेतकऱ्यांसाठी 'कृषी मंच' व 'माती परीक्षण प्रयोगशाळा' सुरू करण्यात आली. सरांनी विविध विद्यापीठीय समित्या, अभ्यास मंडळे तसेच प्राचार्य निवड समित्यांवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना 'कन्नड भूषण', 'समाजभूषण', 'प्रशासकीय वाटसरू', 'आदर्श शिक्षक' यांसह विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचे संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. मानसिंहजी पवार (बापूसाहेब), अध्यक्षा श्रीमती संजीवनी मानसिंह पवार, उपाध्यक्ष श्री. कृष्णा पाटील निकम, सचिव श्री. चंद्रकांतराव देशमुख, कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब मोहिते, ज्येष्ठ संचालक डॉ. पी. के. निकम, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के. महाले, संचालक श्री. लक्ष्मणराव देशमुख (आप्पासाहेब), श्री. विशाल आहेर तसेच संस्थेचे पदाधिकारी, संचालक, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, प्रा. अभय आहेर, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर आणि सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## प्राचार्य केशव भांगे यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा पुरस्कार जाहीर



**शिरूर कासार** : रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांचा 'राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य-२०२६' चा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे विद्यालयात सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' या दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने शिक्षणा बरोबरच साहित्य, कला, क्रीडा, संगीत,व नाट्य अशा विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.अशी अधिकृत घोषणा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे आणि बीड जिल्हाध्यक्ष संतोष मानूरकर यांनी केली आहे.या निवडीमध्ये कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथील प्राचार्य केशव भांगे यांची 'राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य' या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यामुळे विद्यालयात शिक्षक दिनाच्या निमित्ताने सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी यांच्या वतीने प्राचार्य केशव भांगे यांचा शाल,फेटा,पुष्पहार व श्रीफळ देऊन भव्य सत्कार करण्यात आला.आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आत्माराम झिंजुर्डे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.नारायण तांबे यांनी केले.

याप्रसंगी विद्यालयात उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

## गुरुजींनी शिकवला धडा

तनमनाने वर्गात मुलांना,
गुरुजींनी शिकवला धडा.
ज्ञानप्रकाश पाडून डोक्यात,
अज्ञानाचा लावला छडा.

जीवनात खरं बोलण्याचा,
गुरुजींनी शिकवला धडा.
मशाल पेटवूनी ज्ञानाचा,
फोडला अज्ञानाचा घडा.

रोज अक्षर अक्षर गिरवुनी,
शिक्षणाचा लावला ळळा,
शिस्त संस्कार बिंबवुनी अंगी,
फुलविले वैचारिकतेचा मळा.

अन्याय होता छाती ठोकून,
विरोध करायला शिकविले.
ज्ञान देण्याचा गुरूचा वारसा,
ज्ञान वाटून मुलांना घडविले.

मुलांना शिकविता शिकविता,
सदा बदलवतो समाजाचे
रूप.
हाती घेऊन समतेची लेखणी,
वाजवित असतो क्रांतीचे सुप.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## जिल्हा युवा महोत्सवात श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयाला दोन कला प्रकारात प्रथम पारितोषक



**उमरगा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब यांच्या संयुक्त विद्यमानाने ०१ व ०२ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित जिल्हा युवा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभात श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.या महोत्सवात 'रांगोळी' या कलाप्रकारात सुरवसे सुरज शंकर, एम. कॉम. प्रथम वर्ष याने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच 'स्पॉट फोटोग्राफी' या कलाप्रकारात इनामदार मोहम्मदसैफ हजरत, एम. ए. (समाजशास्त्र) प्रथम वर्ष यानेही प्रथम क्रमांक मिळविला.दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांचा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले यांच्या हस्ते तसेच डॉ. जयद्रथ जाधव, वरिष्ठ प्राध्यापक, शिवाजी महाविद्यालय, रेणापुर यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमास विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक डॉ. एस. पी. इंगळे, कला व सांस्कृतिक विभागाचे समन्वयक डॉ. एस. एन. मुच्छटे, डॉ. सी. डी. करे, डॉ. एस. टी. तोडकर, श्रीमती रेश्मा नितनवरे, डॉ. निर्मळे मॅडम, डॉ. सावंत मॅडम, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य गुंडा बापू मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुंगळा ग्रामसभेत जातीय वक्तव्य करणाऱ्या सरपंच पती व मुलावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** तालुक्यातील पुंगळा येथे २९ ऑगस्ट रोजी महादेव मंदिरात झालेल्या ग्रामसभेदरम्यान बौद्ध समाजाबद्दल जातीय द्वेषातून सामाजिक तेढ निर्माण करून अपमानास्पद वक्तव्य करणारे ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच कान्होपात्रा जयवंत जगताप त्यांचे पती जयवंत जनार्धन जगताप व त्यांचा मुलगा विकास जयवंत जगताप यांच्यावर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करावा,यासाठी समस्त आंबेडकरी समाज बांधवांनी पोलिस निरीक्षक व गटविकास अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे. त्यामुळे याप्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. निवेदनानुसार, ग्रामसभेला पंचायत समितीचे विस्तार अधिकारी मुंजाजी डुकरे, जिंतूर पोलिस ठाण्याचे कर्मचारी अमित शिराळकर, पोलीस होमगार्ड केशवे घनसावध आणि घोगरे यांच्यासह पुंगळा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मुरलीधर हजारे, गावचे पोलिस पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बौद्ध समाजातील नागरिकांबाबत जाणीवपूर्वक जातीय द्वेषातून जातीय व अवमानकारक शब्दांचा वापर झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला असून, त्यामुळे बौद्ध समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचे म्हटले आहे. संबंधित व्यक्तींच्या राजकीय प्रभावामुळे तक्रारदार व साक्षीदारांवर दबाव किंवा हस्तक्षेप होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.निवेदकांनी ग्रामसभेचे इतिवृत्त, उपस्थिती नोंद, उपलब्ध व्हिडिओ व इतर पुराव्यांची तपासणी करून संबंधितांविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम तसेच लागू कायद्यांनुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे. ग्रामसभेला उपस्थित अधिकाऱ्यांचे जबाब नोंदवून त्यांना साक्षीदार करण्याची मागणीही करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणाच्या निषेधार्थ जिंतूर पंचायत समिती कार्यालयासमोर मंगळवार, ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता एकदिवसीय निषेध आंदोलन करण्याचा इशारा आंबेडकरी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनाला जिंतूर तालुक्यातील बौद्ध समाज बांधव भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे स्थानीक प्रशासन या प्रकरणावर कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. सादर निवेदनावर अॅड.चंद्रकांत बहिरट, विकासआण्णा मोरे सुमेध सूर्यवंशी, शरद चव्हाण सतिश वाकळे अशोक वाकळे रावसाहेब खंदारे अक्षय सूर्यवंशी मोहन घनसावध महेंद्र बनसोडे युवराज घनसावध राधे काकडे भास्कर गजभारे आशिष तुरुकमाने धम्मदीप चव्हाण सुशील डोंगरदिवे शंकर वाघ लखन खिल्लारे सतीश अंभोरे करण काकडे भास्कर सूर्यवंशी सुदर्शन चव्हाण सागर चव्हाण राहुल डोळसे यांच्या स्वाक्षरी आहेत.

## कर्नाटकात अपहरण झालेल्या वांगी खुर्दच्या ग्रामस्थाची सुखरूप सुटका




**सिल्लोड (प्रतिनिधी) :** सोलापूर बसस्थानकावरून दोन महिन्यांपूर्वी अपहरण करून कर्नाटकातील एका खेड्यात मेंढपाळाच्या कामासाठी डांबून ठेवलेल्या वांगी खुर्द (ता.सिल्लोड) येथील श्री.सांडू भाऊराव बोरसे यांची अखेर सुखरूप सुटका करण्यात आली आहे.केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांच्या अथक पाठपुराव्यामुळे आणि कर्नाटक पोलिसांच्या मदतीने ही कारवाई फत्ते झाली.बोरसे बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच विजय म्हस्के पाटील यांनी कर्नाटकचे पोलीस उपअधिक्षक, पोलीस उपविभागीय अधिकारी व पोलीस उपनिरीक्षक हारून अक्तर यांच्याशी संपर्क साधून तपासाची चक्रे फिरवली. तंत्रज्ञानाच्या मदतीने लोकेशन ट्रेस करून बोरसे यांची सुटका करण्यात आली.या मोहिमेत संभाजीनगरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश धोंडे व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष आदित्य दराडे यांचेही सहकार्य लाभले. एका चिंताग्रस्त कुटुंबाची चिंता दूर झाल्याचे समाधान विजय म्हस्के पाटील यांनी व्यक्त केले असून, वांगी खुर्द ग्रामस्थांनी त्यांचे व पोलिसांचे आभार मानले आहेत."माझ्या वांगी खुर्द गावातील ग्रामस्थ दोन महिन्यांपासून बेपत्ता आणि अपहरण झालेल्या अवस्थेत होते.

कुटुंबीयांनी माझ्याकडे मदत मागितल्यानंतर मी पोलीस प्रशासनाच्या सतत संपर्कात राहून पाठपुरावा केला. आज सांडू बोरसे यांची सुखरूप सुटका झाली असून एका चिंताग्रस्त कुटुंबाच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद परतला,यातच माझ्या सामाजिक कार्याचे खरे समाधान आहे."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६


## बी.जी.पी.एस. बी.एड. महिला महाविद्यालय व राजर्षी शाहू मॅनेजमेंट छत्रपती संभाजीनगर तर्फे शिक्षक दिन उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** बी.जी.पी.एस. बी.एड. महिला महाविद्यालय व राजर्षी शाहू इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त विविध शैक्षणिक व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. जे. के. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रा. निलेश पुरे यांनी प्रास्ताविकातून शिक्षकांचे समाजातील अनन्यसाधारण स्थान आणि भावी शिक्षकांची राष्ट्रनिर्मितीतील भूमिका यावर प्रकाश टाकला.यावेळी बी.जी.पी.एस. बी.एड. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत तट पाटील, राजर्षी शाहू इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ. कुरेशी, प्रमुख पाहुणे डी.एस.आर. एज्युकेशन कॉलेजचे प्राचार्य डॉ. सय्यद एजाज, डॉ. शेख मोहम्मदी, श्री.पी. आर.जाधव सर, श्री. आत्माराम पवार सर, माजी प्राचार्य एस. एम. पवार, विभागप्रमुख वाघ सर, प्रा. यू. एन. परघणे, प्रा. आम्रपाली ढाले, प्रा. संजय जाधव व श्री. अक्षय चन्ने आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवर व प्रमुख पाहुण्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.शिक्षक दिनाचे औचित्य साधून ‘शिक्षक : ज्ञानाचा दीपस्तंभ’ या विषयावर काव्यवाचन, ‘आदर्श शिक्षक कसा असावा?’ या विषयावर वक्तृत्व तसेच भित्तिपत्रक स्पर्धा घेण्यात आल्या. काव्यवाचन स्पर्धेत रामेश्वरी कानडे हिने प्रथम क्रमांक मिळविला. वक्तृत्व स्पर्धेत मोनिका सुरासे हिने बाजी मारली, तर भित्तिपत्रक स्पर्धेत अश्विनी शेळके हिने प्रथम क्रमांक पटकावला.स्पर्धांमध्ये दीपाली ठाले, करीना पुरे, रामेश्वरी कानडे, शामल देशमुख, मयुरी शेळके, भाग्यश्री शहापूरकर, प्रतीक्षा बोरगड, रजनी गुप्ता व अर्चना जोशी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्यांनी “आदर्श शिक्षक हा केवळ पुस्तकी ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या भावविश्वाला समजून घेऊन त्यांच्यात चिकित्सक विचार, मूल्यदृष्टी व आत्मविश्वास निर्माण करणारा असावा,” असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. श्रीकांत तट पाटील यांनी भावी शिक्षिकांनी निष्ठा, समर्पण व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीना पुरे हिने केले, तर योगिता यंड्डाइत यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पंडित साहेबांनी हजारो लोकांना अन्नाला लावले - प्राचार्य डॉ. विश्वास कदम




**गेवराई :** जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी कार्यात सदैव अग्रेसर असलेले मा. श्री. जयसिंह (जयभाऊ) शिवाजीराव पंडित साहेब यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालय, येथील सर्व कर्मचारीवर्गाच्या वतीने ‘आपला परिवार’ अनाथ-वृद्धाश्रम येथे अन्नदानाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.यावेळी आश्रमातील अनाथ, निराधार व वृद्ध व्यक्तींना तीन दिवस पुरेल इतक्या अन्नाची व्यवस्था करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे रोख स्वरूपात मदत दिली. या माध्यमातून मा. श्री. जयसिंह पंडित साहेब यांचा वाढदिवस समाजातील गरजू, निराधार आणि वृद्ध बांधवांसोबत साजरा करण्यात आला.या प्रसंगी बोलताना जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की,“पंडित परिवाराने अनेकांना अन्नाला लावले आहे. हजारो लोकांच्या जीवनात शिक्षण, रोजगार आणि विविध माध्यमांतून आधार निर्माण करण्याचे कार्य पंडित परिवाराने केले आहे. समाजातील गरजू व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे, त्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देणे आणि समाजाप्रती आपली बांधिलकी जपणे हीच पंडित परिवाराच्या कार्याची प्रेरणा आहे.”पुढे ते म्हणाले की, मा. जयसिंह पंडित साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापेक्षा सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी काहीतरी करण्याचा संकल्प महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी केला. त्यातूनच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना अन्नदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा उपक्रम केवळ अन्नदानापुरता मर्यादित नसून समाजातील निराधार आणि वंचित घटकांप्रती असलेली संवेदनशीलता व्यक्त करणारा आहे.या वेळी आश्रमातील वृद्धांशी संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची विचारपूस करण्यात आली. वाढदिवसानिमित्त अन्नदानाच्या माध्यमातून मिळालेल्या या मदतीबद्दल आश्रमातील वृद्धांनी समाधान व्यक्त केले. वाढदिवसाच्या उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देऊन तो अधिक अर्थपूर्ण करण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे उपस्थितांनी सांगितले.पंडित परिवाराच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यातून प्रेरणा घेऊन महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकत्र येत राबविलेल्या या उपक्रमामुळे ‘वाढदिवस म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर समाजासाठी काहीतरी देण्याचा दिवस’ हा संदेश देण्यात आला.या उपक्रमामुळे अनाथ व वृद्धाश्रमातील नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. सामाजिक संवेदनशीलता, सेवाभाव आणि माणुसकी जपणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.या अन्नदान उपक्रमासाठी जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय येथील प्राचार्य डॉ.सरकटे एच. एस. व सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६

# कागदावर जपलेले मन - पत्रलेखन

**प**त्रलेखन ही केवळ एक कला नव्हती, ती एक संस्कृती होती. मनाचा एक कोपरा कागदावर अलगद उतरवून, तो दुसऱ्या मनाच्या कप्प्यात कायमचा ठेवण्याची संस्कृती.आज आपण ज्याला कम्युनिकेशन म्हणतो, ते तेव्हा संवाद होता. आज जसा मेसेज टाईप करतो, तसे तेव्हा पत्र लिहिले जात नसे. ते लिहिले जात असे, जगले जात असे. त्यासाठी वेळ काढावा लागे, मनाची तयारी करावी लागे, आठवणींना हाक मारावी लागेआपल्या पिढीच्या मराठीच्या पुस्तकात पत्रलेखनाला एक ठराविक मान होता. वीस गुणांचा प्रश्न. हमखास येणारा. "उन्हाळ्याच्या सुट्टीत तू केलेल्या सहलीचे वर्णन करणारे पत्र तुझ्या मित्राला लिही.""तुझ्या प्रगतीची माहिती कळवणारे पत्र वडिलांना लिही."आम्ही लिहायचो. वर उजव्या कोपऱ्यात दिनांक. त्याखाली 'स.न.वि.वि.' म्हणजे साष्टांग नमस्कार विनंती विशेष. हे स.न.वि.वि. लिहितानाच मनात एक नम्रता यायची. पत्राची सुरुवात कशी करायची, पहिला परिच्छेद कसा असावा, शेवट कसा करायचा - 'तुझाच लाडका मित्र', 'तुझा विश्वासू', 'तुझी लाडकी बहीण' याला एक शिस्त होती. ती शिस्त केवळ व्याकरणाची नव्हती, ती मनाची शिस्त होती.शिक्षक लाल शाईने अक्षरावर गोल करायचे. सुंदर अक्षराचे कौतुक व्हायचे. कारण तेव्हा अक्षर म्हणजे माणसाची ओळख होती. अक्षरावरून माणूस कळायचा. आज फॉन्ट एकसारखे असतात, तेव्हा प्रत्येकाचे अक्षर वेगळे होते, त्याच्या स्वभावासारखे.पत्र लिहिण्यापेक्षाही मोठी गोष्ट होती, पत्राची वाट पाहणे.दुपारी तीन च्या सुमारास सायकलच्या घंटीचा आवाज आला की घरात एक चलबिचल व्हायची. खाकी कपड्यातला पोस्टमन. त्याच्या खांद्यावरची पिशवी म्हणजे जणू भावनांचे गाठोडे. तो प्रत्येक घरासमोर थांबला की मनात एकच प्रश्न, "आपलं काही आलंय का?" जर आपले नाव असलेला लिफाफा हातात पडला, तर त्याचा आनंद आजच्या हजार लाईक्सपेक्षाही मोठा असायचा. लिफाफा लगेच फाडायचा नाही. आधी त्यावरचे अक्षर न्याहाळायचे. कोणाचे आहे ते ओळखायचे. कधी कधी अक्षर न पाहताही कळायचे, हे आईचेच आहे, हे बाबांचे आहे, हे दूरच्या मित्राचे आहे.कागदाला एक स्पर्श असायचा. तो कागद लिहिणाऱ्याच्या हातातून आला होता, त्याच्या टेबलावर काही काळ पडून होता, त्याच्या मनाचा भार घेऊन आपल्यापर्यंत प्रवास करत आला होता. त्या कागदाला त्याच्या घरचा, त्याच्या हाताचा, कधी कधी त्याने वापरलेल्या शाईचा मंद सुगंध असायचा. ते पत्र वाचणे म्हणजे केवळ मजकूर वाचणे नव्हते, ती माणसाची भेट होती.बऱ्याचदा पत्राच्या शेवटी एक ओळ असायची, "इकडचे सर्व ठीक आहे, तिकडचे कळवावे." या एका ओळीत केवढी आपुलकी, केवढी काळजी दडलेली असायचीहळूहळू जग बदलले.पहिले लँडलाईन आले. मग मोबाईल आला. मग इंटरनेट आणि व्हॉट्सॲप.सध्या संवादाचा वेग वाढला. पूर्वी "तुझी खूप आठवण येते" हे सांगण्यासाठी तीन पानी पत्र लिहावे लागे, त्याला अंतर्देशीय लिफाफ्यात घालावे लागे, पोस्टाच्या पेटीत टाकावे लागे, मग सात दिवस वाट पाहावी लागे. आज तेच आपण दोन सेकंदात टाईप करतो. उत्तरही लगेच येते. ब्लू टिक येतो.वेग प्रचंड वाढला, हे खरे. पण या वेगाच्या शर्यतीत आपण काय गमावले?आपण थांबायला विसरलो. वाट पाहायला विसरलो. पत्राची वाट पाहण्यात जी उत्कंठा होती, जी तगमग होती, त्यात प्रेम अधिक घट्ट होत होते. विरहाने प्रेम वाढते म्हणतात, ते याच कारणाने. आज तात्काळ उत्तर मिळते, पण त्या उत्तराची किंमत राहिली नाही. जे सहज मिळते, त्याची किंमत कमी होते, हा मानवी स्वभाव आहे.पूर्वी एका पत्राचा आपण कितीतरी वेळा विचार करायचो. काय लिहावे, कसे लिहावे, समोरच्याला काय वाटेल. शब्द तोलून मापून वापरले जायचे. कारण एकदा शाई कागदावर उमटली की ती खोडता येत नाही. आज मेसेजमध्ये आपण 'डिलीट फॉर एव्हरीवन' करतो. आपण चुकतो आणि पुसून टाकतो. पत्रात ती सोय नव्हती. त्यामुळे माणूस शब्द जपून वापरायचा. नात्यांमध्येही हाच जप होता.आज आपल्या मोबाईलमध्ये हजारो मेसेज आहेत. पण त्यातला एक तरी मेसेज असा आहे का, जो आपण जपून ठेवावा, जो पुढच्या पिढीला दाखवावा?मोबाईलमधील संदेश आपण वाचतो आणि स्क्रोल करून पुढे जातो. तो तिथेच संपतो.पण एखादे जुने पत्र... घर आवरताना, एखाद्या जुन्या पुस्तकात, ट्रंकेमध्ये अचानक एखादे पत्र सापडते. त्याची घडी उलगडताच काळ मागे जातो. वीस वर्षांपूर्वी गेलेल्या आजोबांचे अक्षर समोर येते. आईने वयाच्या सोळाव्या वर्षी लिहिलेले पत्र सापडते. त्या अक्षरांमधून माणूस पुन्हा जिवंत होतो. डोळ्यांच्या कडा नकळत ओल्या होतात. कारण त्या कागदावर फक्त शब्द नाहीत, तर त्या माणसाच्या बोटांचे ठसे आहेत, त्याच्या मनाचा एक तुकडा आहे.पत्राला वय नसते. मेसेजला असते. मेसेज जुना होतो, पत्र जुने होऊनही नवे राहते. आजच्या पिढीने ही हरवलेली कला पुन्हा शोधायला हवी. ही केवळ नॉस्टॅल्जिया नाही, ही मानसिक गरज आहे.कधीतरी मोबाईल बाजूला ठेवा. एक साधा कागद घ्या. पेन घ्या. आणि लिहा.आईसाठी लिहा, जिने तुमच्यासाठी कधी पत्राची अपेक्षा केली नाही, पण तुम्ही लिहिले तर तिचा दिवस उजळून निघेल. बाबांसाठी लिहा, ज्यांना तुम्ही रोज फोन करता, पण कधी मनातले कृतज्ञतेचे दोन शब्द कागदावर उतरवले नाहीत.एखाद्या जुन्या मित्रासाठी लिहा, ज्याच्याशी फक्त 'हॅपी बर्थडे' च्या फॉरवर्डेड मेसेजपुरतेच नाते उरले आहे. त्याला सांगा की तुला त्या शाळेच्या बाकाची, त्या कट्ट्याची अजूनही आठवण येते.दूर गेलेल्या बहिणीला, परदेशात असलेल्या मुलाला, गावाकडच्या आजीला लिहा.कदाचित ते पत्र पोहोचायला चार दिवस लागतील. पण जेव्हा ते पोहोचेल, तेव्हा समोरच्याच्या मनात जो आनंद उमटेल, तो कोणत्याही व्हिडिओ कॉलमध्ये उमटणार नाही. कारण समोर स्क्रीन नाही, तर तुमचे अक्षर आहे, तुमचा वेळ आहे, तुमचे मन आहे. आपण एक छोटा संकल्प करूया.संदेश जरूर पाठवूया, कारण काळाची गरज आहे. पण कधीतरी पत्रही लिहूया.शब्द जरूर बोलूया, पण कधीतरी अक्षरांतून मनही व्यक्त करूया.नाती जरूर जपूया, पण त्या नात्यांसाठी एखादा कागदही जपून ठेवूया.कारण शेवटी सत्य हेच आहे. सर्व्हर डाऊन झाला की मेसेज जातात, मोबाईल बदलला की चॅट हिस्ट्री पुसली जाते, पण मनापासून लिहिलेले एक पत्र, कपाटाच्या एका कोपऱ्यात, एका पुस्तकाच्या पानांमध्ये, आयुष्यभर, किंबहुना आयुष्यानंतरही जिवंत राहते.



**~प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे.**
जे ई एस महाविद्यालय जालना.

# बोरीच्या जैन वाचनालयाने ज्ञानाची अखंड ज्योत प्रज्वलित ठेवली- दिपाली ताई चौधरी



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** तालुक्यातील बोरी येथे महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' प्राप्त बोरीच्या जैन वाचनालयाने ज्ञानाची अखंड ज्योत प्रज्वलित ठेवत, सामाजिक आणि शैक्षणिक बांधिलकी जपली आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्या सौ दिपालीताई अजय चौधरी यांनी केले. 5 सप्टेंबर 2026 शिक्षक दिनानिमित्त वाचनालयाच्या वतीने आयोजित आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ मिना जैन या होत्या तर व्यासपीठावर सत्कारमूर्ती प्रवीण रांजवण, सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत आडके, भाजपा नेते तथा तिरुपती बँकेचे अध्यक्ष सतीश राव चौधरी, पोलीस उपनिरीक्षक महादेव गायकवाड, माजी केंद्रप्रमुख मोहम्मद शफी, दीपक कनकुटे, ग्रामपंचायत सदस्या अश्विनीताई चौधरी, मुख्याध्यापक गोरे सर, रामा राठोड , दीपक राजुरकर,आदींची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशाला बोरीच्या आरसीन पठाण व प्रांजल सुगावकर यांनी स्वागत गीत गायले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी प्रास्ताविकातून वाचनालयाची भूमिका विशद केली.आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्राप्त प्रवीण रांजवण यांना मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व भेट देऊन सन्मानित करण्यात आले .यावेळी मार्गदर्शन करताना दिपाली चौधरी म्हणाल्या की,शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असतो. एका पिढीला सुशिक्षित, सुसंस्कृत आणि सक्षम बनवण्याचे मोठे काम शिक्षक करत असतात. आज अशाच एका कर्तृत्ववान शिल्पकाराचा, जिल्हा परिषद प्रशाला, बोरीचे मुख्याध्यापक प्रवीण रांजवण सरांचा 'आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' देऊन गौरव केला जात आहे, ही त्यांच्या कामाची पावती आहे असे मी समजते.चांगल्या कामाची कुठेतरी नोंद होतच असते, जैन वाचनालयाने रांजवण सरांची या पुरस्कारासाठी निवड केली असे सांगून सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत आडके यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.ज्या शाळेच्या वर्गात बसून मी शिक्षण घेतले ,त्याच शाळेच्या व्यासपीठावर आज शिक्षकांबद्दल बोलण्याची संधी मिळत आहे. ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे मत तिरुपती बँकेचे अध्यक्ष तथा भाजपा नेते सतीश चौधरी यांनी स्पष्ट करून सत्कारमूर्ती रांजवण सरांना शुभेच्छा दिल्या तर जैन वाचनालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.बोरीच्या जैन वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. केवळ पुस्तकांची देवाण-घेवाण न करता विविध सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करून हे वाचनालय बोरीचे एक सांस्कृतिक केंद्र बनवले आहे, असे प्रतिपादन संतोष तायडे यांनी व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना आदर्श मुख्याध्यापक प्रवीण रांजवण म्हणाले की, शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार प्राप्त बोरीच्या जैन वाचनालयाने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कारासाठी माझी निवड केली, निश्चितच या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी आणखी वाढली आहे. शाळेच्या विकासासाठी ज्यांना ज्यांना मदत मागितली त्या सर्वांनी मदत केली त्यामुळेच मी शाळेसाठी विविध उपक्रम राबवू शकलो. माझे सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मला मोलाची साथ मिळाली त्यामुळे मी या शाळेसाठी काहीतरी करू शकलो. अध्यक्षीय समारोप वाचनालयाच्या अध्यक्षा सौ.मीना जैन यांनी केला. रांजवण सरांचे कार्य पाहूनच आम्ही त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरीष बोरोले सरांनी यांनी केले तर वाचनालयाचे उपाध्यक्ष पवन ओझा यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास जिल्हा परिषद प्रशाला, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व प्राथमिक शाळेचे शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६

# देशातील रिटायर व्यक्तींनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक बदलासाठी कार्य केल्याने देशाच्या विकासामध्ये वृद्धी होईल

मित्रांनो आज आपण एक वेगळ्या आणि चांगल्या विषयाचे चिंतन करणार आहोत. निवृत्ती म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे, तर अनुभव, ज्ञान आणि सामाजिक बांधिलकी यांचा नव्या दिशेने उपयोग करण्याची सुरुवात आहे. माणूस सरकारी किंवा खासगी सेवेतून निवृत्त होतो; परंतु त्याच्याकडे असलेले ज्ञान, अनुभव, कौशल्य, शिस्त आणि समाजाबद्दलची जाण कधीही निवृत्त होत नाही. त्यामुळे देशातील निवृत्त व्यक्तींनी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक परिवर्तनासाठी पुढे येणे ही काळाची गरज आहे.आज आपल्या देशात लाखो व्यक्ती विविध क्षेत्रांतून निवृत्त होत आहेत. शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी, सैनिक, बँक कर्मचारी, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी आणि विविध व्यवसायांतील अनुभवी व्यक्ती निवृत्तीनंतर आपल्या आयुष्याचा मोठा काळ समाजासाठी देऊ शकतात. त्यांच्या अनुभवाचा योग्य उपयोग झाला तर देशाच्या विकासाला निश्चितच नवी गती मिळू शकते.अनुभव ही राष्ट्राची संपत्ती तरुणाईकडे ऊर्जा आहे, तर निवृत्त व्यक्तींकडे अनुभव आहे. या दोन्ही शक्तींचा समन्वय झाला तर समाजात मोठे परिवर्तन घडू शकते. एखाद्या क्षेत्रात २५–३० वर्षे काम केलेल्या व्यक्तीने त्या क्षेत्रातील अडचणी, व्यवस्था, माणसे आणि उपाय जवळून पाहिलेले असतात. त्यामुळे त्यांचा अनुभव हा समाज बदलाच्या कामी येणार आहे.निवृत्त व्यक्तींनी केवळ आपल्या कुटुंबापुरते जीवन मर्यादित न ठेवता आपल्या अनुभवाचा काही भाग समाजाला द्यावा. गावातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, युवकांना करिअरविषयक सल्ला देणे, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती देणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मार्गदर्शन करणे, गावातील समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे अशी अनेक कामे ते करू शकतात.समाजामध्ये आजही अनेक समस्या आहेत. शिक्षणातील असमानता, बेरोजगारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, पाणीटंचाई, पर्यावरणाचा ऱ्हास, महिलांच्या समस्या, वृद्धांची उपेक्षा आणि ग्रामीण भागातील विकासाचा अभाव अशा अनेक प्रश्नांवर समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.निवृत्त व्यक्तींनी गावागावात छोटे सामाजिक गट तयार करून या प्रश्नांवर काम केले तर सकारात्मक परिणाम दिसू शकतो. उदाहरणार्थ, निवृत्त शिक्षकांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका सुरू करावी. निवृत्त बँक अधिकाऱ्यांनी युवकांना आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण द्यावे. निवृत्त कृषी अधिकारी किंवा अनुभवी शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांना पाणी बचत, पीक नियोजन आणि शेतीपूरक व्यवसायाचे मार्गदर्शन करावे. निवृत्त अभियंत्यांनी गावातील पाणी, रस्ते आणि पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांवर तांत्रिक मार्गदर्शन करावे.ही सेवा मोठ्या संस्थेच्या माध्यमातूनच झाली पाहिजे असे नाही. प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतेनुसार दर आठवड्याला काही तास समाजासाठी दिले तरी त्यातून मोठी चळवळ उभी राहू शकते.राजकारणात मूल्याधिष्ठित सहभागलोकशाहीमध्ये राजकारणाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. मात्र राजकारणाकडे केवळ सत्ता,संपत्ती मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता समाजसेवेचे माध्यम म्हणून पाहण्याची गरज आहे.निवृत्त व्यक्तींनी राजकीय पक्षांच्या पलीकडे जाऊन लोकशाही मूल्ये, संविधानिक विचार, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांच्या हक्कांबाबत जनजागृती करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजावर नागरिकांनी लक्ष ठेवावे, ग्रामसभेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि विकासाच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण चर्चा घडवून आणावी.निवृत्त व्यक्तींच्या अनुभवामुळे राजकारणात संयम, संवाद, शिस्त आणि वस्तुनिष्ठ विचार वाढू शकतो. त्यांनी तरुणांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. स्वतः निवडणूक लढवणे हा एकमेव मार्ग नाही; चांगल्या उमेदवारांना मार्गदर्शन करणे, मतदारांना जागरूक करणे आणि स्थानिक प्रश्नांवर रचनात्मक दबाव निर्माण करणे हेही लोकशाहीतील महत्त्वाचे योगदान आहे.शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी संधीशिक्षण हे राष्ट्रनिर्मितीचे सर्वात प्रभावी साधन आहे. निवृत्त शिक्षक आणि प्राध्यापकांनी आपल्या अनुभवाचा उपयोग ग्रामीण आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी केला तर हजारो मुलांचे जीवन बदलू शकते.आज डिजिटल शिक्षणामुळे ज्ञानाची साधने सर्वांसाठी उपलब्ध होत आहेत; परंतु त्यांचा योग्य वापर करण्यासाठी मार्गदर्शनाची गरज आहे. निवृत्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावावी, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करावे, इंग्रजी व संगणकाचे ज्ञान द्यावे आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबवावेत.एखाद्या गावात निवृत्त शिक्षकांनी आठवड्यातून दोन दिवस विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग घेतले, तर त्या गावातील अनेक मुलांना शहरात जाऊन महागडे क्लासेस करण्याची गरज भासणार नाही. अशा छोट्या प्रयत्नातून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.तरुण आणि निवृत्त व्यक्तींचा सेतूदेशाच्या विकासासाठी तरुणाई आणि अनुभवी पिढी यांच्यातील संवाद अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा तरुणांकडे नवीन कल्पना असतात; मात्र अनुभवाचा अभाव असतो. दुसरीकडे निवृत्त व्यक्तींकडे अनुभव असतो; परंतु नवीन तंत्रज्ञान आणि आधुनिक पद्धतींची माहिती कमी असू शकते.दोन्ही पिढ्यांनी एकमेकांकडून शिकण्याची गरज आहे. निवृत्त व्यक्तींनी तरुणांना केवळ सल्ले देण्याऐवजी त्यांच्यासोबत काम केले पाहिजे. तरुणांनीही ज्येष्ठांच्या अनुभवाकडे जुनाट विचार म्हणून न पाहता त्यातील उपयुक्तता समजून घेतली पाहिजे.अनुभव,ऊर्जा, आधुनिक तंत्रज्ञान विकासाची नवी दिशाहा विचार स्वीकारला तर भारताच्या विकासाला अधिक व्यापक आणि शाश्वत स्वरूप प्राप्त होऊ शकते.गावाच्या विकासासाठी निवृत्त व्यक्तींची समितीप्रत्येक गावात निवृत्त शिक्षक, कर्मचारी, अधिकारी, शेतकरी आणि अनुभवी नागरिक यांची एक “ज्येष्ठ नागरिक विकास समिती” स्थापन करता येऊ शकते. ही समिती कोणत्याही राजकीय पक्षाच्या नियंत्रणाखाली नसून गावाच्या विकासासाठी मार्गदर्शक म्हणून काम करू शकते.गावातील पाणी, शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार, पर्यावरण, महिला व युवकांचे प्रश्न यांचा अभ्यास करून ग्रामसभेसमोर ठोस सूचना मांडता येतील. सरकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवता येईल. शासकीय कार्यालये आणि सामान्य नागरिक यांच्यात संवादाचा पूल निर्माण करता येईल.यामुळे निवृत्त व्यक्तींना समाजात सक्रिय भूमिका मिळेल आणि गावाच्या विकासाला अनुभवी नेतृत्व मिळेल.निवृत्ती म्हणजे विश्रांती नव्हे, नव्या जबाबदारीची सुरुवात नोकरीतून निवृत्ती घेतल्यानंतर काही काळ विश्रांती घेणे स्वाभाविक आहे. परंतु त्यानंतर जीवनाला नवी दिशा देणे आवश्यक आहे. शरीराची क्षमता पूर्वीसारखी नसली तरी बुद्धी, अनुभव आणि विचारशक्ती मोठी ताकद असते.ज्यांनी आयुष्यभर देशाच्या विविध संस्थांमध्ये सेवा केली, त्यांनी निवृत्तीनंतर समाजाला परत देण्याचा संकल्प केला तर तो खऱ्या अर्थाने राष्ट्रसेवेचा आदर्श ठरेल.आज भारताला केवळ आर्थिक विकासाची नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक, नैतिक आणि लोकशाही मूल्यांचीही समृद्धी आवश्यक आहे. या सर्व क्षेत्रांत निवृत्त व्यक्तींची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरू शकते.देशाचा विकास हा केवळ सरकारच्या योजनांमधून होत नाही. सरकार, उद्योग, सामाजिक संस्था, तरुणाई आणि अनुभवी नागरिक या सर्वांनी एकत्रितपणे काम केल्याने विकासाची प्रक्रिया मजबूत होते.निवृत्त व्यक्तींनी आपल्या आयुष्याच्या दुसऱ्या पर्वाकडे “माझ्यासाठी” नव्हे, तर “समाजासाठी” म्हणून पाहिले तर त्यांच्या जीवनाला नवा अर्थ मिळू शकतो. एका निवृत्त शिक्षकाने दहा मुलांना दिशा दिली, एका निवृत्त अधिकाऱ्याने गावातील विकासकामाला पारदर्शकता दिली, एका निवृत्त बँक अधिकाऱ्याने युवकांना आर्थिक शिस्त शिकवली आणि एका अनुभवी शेतकऱ्याने दहा शेतकऱ्यांना नवी शेतीपद्धती शिकवली, तर त्या प्रत्येक कृतीतून राष्ट्रनिर्मितीची वीट रचली जाते.वय वाढते, पण अनुभवाची किंमत कमी होत नाही.नोकरी संपते, पण समाजसेवेची जबाबदारी संपत नाही.निवृत्ती येते, पण राष्ट्रसेवा कधीही निवृत्त होत नाही.म्हणूनच देशातील प्रत्येक निवृत्त व्यक्तीने आपल्या अनुभवाचा काही भाग सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक परिवर्तनासाठी देण्याचा संकल्प केला पाहिजे. अनुभवी पिढी आणि ऊर्जावान तरुणाई हातात हात घालून पुढे आली, तर विकसित, सक्षम, समतामूलक आणि संवेदनशील भारत घडविण्याचे स्वप्न नक्कीच साकार होईल.

# वेरुळ फाटा-अजमपुर रस्ता बनला मृत्यूचा सापळा; नागरिकांचा जीव टांगणीला



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** वेरुळ फाटा ते अजमपुर या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने वाहनचालक आणि नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे, पाण्याने भरलेले खड्डे,उखडलेले डांबर आणि खराब झालेल्या मार्गामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात गाड्यांची वर्दळ असते वेरुळला जाण्यासाठी बोरगाव कडून लांब पडते त्यामुळे मधल्या रस्त्याने जातात,शाळेच्या बस, शेतकरी तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनचालकांना खड्डे चुकवत प्रवास करावा लागत असून, विशेषतः रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे.रस्ता दुरुस्तीअभावी नागरिकांमध्ये नाराजीवारंवार मागणी करूनही रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित प्रशासनाने या रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि रस्त्याची आवश्यक ती डागडुजी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.“अपघात होण्याची वाट पाहण्याऐवजी प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६


## बंजारा समाजाच्या ‘एसटी’ आरक्षणासाठी आढे पुन्हा उपोषणावर



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण मिळावे, या मागणीसाठी गेल्या वर्षभरापासून लढा देणारे विनोद विश्वनाथ आढे यांनी शनिवार (ता. ५) पुन्हा उपोषण सुरू केले आहे. जिंतूर तहसील कार्यालयासमोर ते उपोषणास बसले असून, शासनाकडून वारंवार आश्वासने मिळूनही मागणीवर ठोस निर्णय होत नसल्याने त्यांनी आंदोलनाचे पाऊल उचलले आहे. निवेदनानुसार, ५ सप्टेंबर २०२५ रोजी आढे यांनी याच मागणीसाठी उपोषण केले होते. त्यावेळी प्रशासनाकडून आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी उपोषण स्थगित केले. त्यानंतर ८ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री यांच्यासोबत झालेल्या बैठकीत बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा देण्यात आली होती. मात्र, अद्यापही ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप आढे यांनी केला आहे. तसेच ६ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन व उपोषण करण्यात आले होते. त्यावेळीही शासनाकडून लेखी आश्वासन देण्यात आले. मात्र, वर्षभर उलटूनही मागणीची अंमलबजावणी न झाल्याने बंजारा समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.“आता केवळ आश्वासन नको, बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणावर ठोस निर्णय हवा,” अशी भूमिका घेत आढे यांनी पुन्हा उपोषण सुरू केले आहे. आंदोलनस्थळी संबंधित प्रशासनाने उपस्थित राहून चर्चा करावी आणि शासनाच्या आश्वासनांबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## मुख्यमंत्री समुदाय आरोग्य शिबिरात १५ हजार ८५९ रुग्णांची तपासणी



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : सामान्यांचे प्रश्न सोडवणे, शासकीय योजनांमध्ये पारदर्शकता आणणे आणि गतिशील प्रशासनाद्वारे योजना थेट लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने मुरूम (ता. उमरगा) येथील विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्यावर रविवारी (ता. ६) रोजी मुख्यमंत्री समुदाय आरोग्य शिबीर अत्यंत उत्साहात पार पडले. मुख्यमंत्री सहायता कक्ष, धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हा आरोग्य विभाग (धाराशिव) आणि शरण पाटील फाउंडेशन (उमरगा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात तब्बल १५ हजार ८५९ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी भूषवले. चौकट : जनसेवेचा वसा अखंड — राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकरलोकांच्या सेवेसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करणे हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे सांगत राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी भाजप नेते शरण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, या शिबिराच्या माध्यमातून रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार व गोळ्या दिल्या जात आहेत. प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ५ लाखांपर्यंतचा आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत ५ लाखांपर्यंतचा मोफत उपचाराचा लाभ मिळत आहे. आता दोन हजारांपेक्षा जास्त आजारांवर ही कॅशलेस योजना लागू करण्यात आली असून, आगामी काळात उमरग्यात शंभर खाटांचे महिला रुग्णालय व मुरूम येथे ५० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. तसेच पळसगाव येथील वीज फीडरची कामे पूर्णत्वाकडे जात असून परिसरातील वीजप्रश्न लवकरच मार्गी लागेल, असेही त्यांनी नमूद केले. चौकट : मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प — आमदार बसवराज पाटीलविधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांनी मनोगतात सांगितले की, फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेले हे आरोग्य शिबीर जनसामान्यांसाठी वरदान ठरत आहे. संकटकाळात लोकांना मदत करणे ही काळाची गरज आहे. मेघनाताई बोर्डीकर यांचे माहेर धाराशिव असल्याने त्यांना मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न आणि रोजगाराची टंचाई जवळून ठाऊक आहे. मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त करण्याचा आपला सगळ्यांचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मणिपूरमध्ये खासदार अजित गोपछडे यांना केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून मोठी संधी मिळाल्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. चौकट : दुष्काळी परिस्थितीत जनसामान्यांच्या पाठीशी शासन — खासदार डॉ. अजित गोपछडेवाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिराचा उपक्रम राबवणे ही उत्तम परंपरा असल्याचे सांगत खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीमध्ये मेघनाताईंनी मुख्यमंत्र्यांकडे ज्या मागण्या मांडल्या, त्याची तातडीने दखल घेत शासनाने सकारात्मक पावले उचलली आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला उपचारासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जात आहे. आई-वडिलांचे आशीर्वाद आणि जनतेचा पाठिंबा यामुळे जनसेवेचा हा यज्ञ असाच सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांची तपासणीया शिबिरात लातूर, धाराशिव, सोलापूर आणि उमरगा-लोहारा तालुक्यातील नामवंत व तज्ज्ञ डॉक्टरांनी कॅन्सर, हृदयरोग, मधुमेह, स्त्रीरोग, बालरोग, नेत्र तसेच कान, नाक, घसा यांसारख्या विविध आजारांनी ग्रस्त रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार केले.शिबिरातील तपासण्या व लाभांची ठळक वैशिष्ट्ये,स्त्रीरोग तपासणी १३११ रुग्ण, मधुमेह तपासणी ३१२५, त्वचारोग ४४१, अस्थिरोग तपासणी २८२२ रुग्ण, नेत्र तपासणी १२५७ रुग्ण (यापैकी ७३ रुग्ण पुढील शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले), बालरोग तपासणी २३९ रुग्ण, ईसीजी ११७ (त्यात दहा रुग्ण आढळून आले) मानसोपचार समुपदेशन २४७५, छातीचे एक्स-रे २६८ रुग्ण, आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे कार्ड वाटप ४४५ लाभार्थी, क्षयरोग रुग्णांना पोषण आहार १०० किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात आमदार प्रवीण स्वामी आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संयोजक शरण पाटील यांनी केले,

सूत्रसंचालन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी मानले. या आरोग्य शिबिराचा उमरगा-लोहारा तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या हजारो नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ सप्टेंबर २०२६


## MPSC पेपरफुटीतील दोषींवर कठोर कारवाई करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची ग्वाही



**मुंबई** : देशातील 'नीट' पेपरफुटीच्या प्रकरणानंतर देशभरात मोठे आंदोलन झाले, ज्यामुळे अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. मात्र, त्यानंतरही महाराष्ट्रात सीईटी आणि अत्यंत पारदर्शक मानल्या जाणाऱ्या 'एमपीएससी' परीक्षेचे पेपर फुटल्याच्या घटना उघडकीस आल्या. एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटल्याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत 6 हून अधिक आरोपींना अटक केली आहे. याच वाढत्या गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने आज सकाळी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपल्या मागण्या मांडल्या.


या शिष्टमंडळामध्ये सचिन ढवळे, यशवंत सोलाट, धनंजय मते, गणेश कड, उमेश कुदळे यांसारखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक आणि विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्ते निखिल पाटील यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या मागण्यांना प्राधान्यक्रम देत, MPSC पेपरफुटीच्या गैरप्रकारात आयोगातील किंवा आयोगाबाहेरील ज्या व्यक्तींचा सहभाग आढळेल, त्या सर्वांना कठोर शिक्षा केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अतिशय पारदर्शी पद्धती विकसित करण्यासाठी सरकार सातत्याने काम करत आहे. ही प्रक्रिया अधिक कशी सुदृढ करता येईल यासाठी राज्यस्तरावर एक उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. त्यात युपीएससीचे माजी सदस्य, पोलिस महासंचालक, आयआयटी प्राध्यापक आणि इतर अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्याचा शासन आदेश सुद्धा निर्गमित करण्यात आला असून ही समिती राज्यभर सर्व विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि सर्व संबंधितांशी सल्लामसलत प्रक्रिया करणार आहे. पुण्यात सुद्धा ही समिती जाईल. एकीकडे हे प्रयत्न होत असताना काही कठोर कायदे सुद्धा करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांवर सरकार कठोर कारवाई करेल.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, औषध निरीक्षक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाची सुद्धा गंभीर दखल घेण्यात आली असून या प्रकरणाचा पोलिसांकडून गतिमान तपास सुरू आहे. आरोपींना अटक देखील करण्यात आली आहे. याचा पुढील तपास सुरुच असून या गैरप्रकारात आयोगातील किंवा आयोगाबाहेरील ज्या व्यक्तींचा सहभाग आढळेल, त्या सर्वांना कठोर शिक्षा केली जाईल. स्पर्धा परीक्षांसाठी प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कष्टांचे चीज होईल, अशाच सुधारणा आम्ही करीत आहोत. त्यांच्यावर कुठलाही अन्याय होऊ दिला जाणार नाही, असा विश्वास फडणवीस यांनी दिला आहे.

तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम दूर करून परीक्षाव्यवस्थेवरील विश्वास कायम राहावा, यासाठी शासन कटिबद्ध आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रश्नपत्रिका निर्मितीपासून परीक्षा प्रक्रियेपर्यंत आवश्यक त्या सुधारणा सर्व घटकांना विश्वासात घेऊन तातडीने अंमलात आणल्या जातील, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

## बालकुमार संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. विनोद सिनकर



**छत्रपती संभाजीनगर** : अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, मुख्य शाखा जालना जिल्हा आणि देवगिरी प्रांत साहित्य भारती शाखा जालना यांच्या वतीने मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी मांडवा ता.बदनापूर जिल्हा जालना येथे आयोजित बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बालसाहित्यिक डॉ. विनोद सिनकर यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. विनोद सिनकर हे मागील सुमारे 32 वर्षांपासून बालसाहित्य लेखन करीत आहेत. 'खाऊ हा पुरवून ठेवा' हा त्यांचा प्रसिद्ध बालकविता संग्रह असून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ तर्फे तो प्रकाशित झाला आहे. त्याची द्वितीय आवृत्ती 'सकाळ' प्रकाशनातर्फे आली आहे. बालकविता, बालकथा, बालनाट्य असे विविध बालसाहित्य प्रकार विनोद सिनकर यांनी हाताळले असून वृत्तपत्रे मासिकांतून त्यांचे लिखाण वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहे. बालसाहित्य या विषयात त्यांनी संशोधन केलेले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे या संशोधनाबद्दल त्यांना पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. ते महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक आहेत. सिनकर यांचे ७५ लेख, ५शोधनिबंध, ३ पुस्तके, ४ संपादित ग्रंथ प्रकाशित असून ७ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. त्यांना अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा बालसाहित्य राज्य पुरस्कार इ. स. २०१२ मध्ये प्राप्त झाला आहे. त्यांच्या बालसाहित्य विषयक कार्याची दखल घेत वरील संस्थांनी सिनकर यांची अध्यक्षपदी निवड केल्याचे साने गुरुजी कथामालेचे डॉ.सुहास सदाव्रते, आर.आर. जोशी, जमीर शेख यांनी कळविले आहे. निवड केली आहे. त्याबद्दल स.भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्ते ज्ञानप्रकाश मोदाणी, ज्येष्ठ बालसाहित्यिक सूर्यकांत सराफ, यशवंतराव चव्हाण सेंटरचे नीलेश राऊत,स. भु. प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, डॉ. रुपेश मोरे, सुबोध जाधव, राजेंद्र वाळके, चंद्रशेखर शर्मा आदींनी सिनकर यांचे अभिनंदन केले आहे.